# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### भाटुंबा (ता. केज जि. बीड) येथील ग्रामपंचायत कार्यालयात संगणक संच नसल्याबाबत

**(१) ३७४०६ (१०-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भाटुंबा गावचे सरपंच (ता. केज, जि. बीड) यांनी त्यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळात म्हणजेच माहे जानेवारी, २०१८ ते आजपर्यंत सदर ग्रामपंचायत कार्यालयात संगणक संच दिसून आला नसल्याची तक्रार मुख्यकार्यकारी अधिकारी, बीड यांना दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ग्रामपंचायत कार्यालयात संगणक नसताना संगणक ऑपरेटरला जुने सरपंच व ग्रामसेवक यांचेकडून एका वर्षासाठी ७० ते ७५ हजार रुपये देण्यात आल्याने त्यांचेकडून सदरहू रक्कम वसूल करण्यासह सदरहू ग्रामपंचायतीला दिलेला संगणक बारकोड (सिरीयल नंबर) व कार्यालयीन कामकाजाकरीता संगणक ग्रामपंचायत कार्यालयाला देण्यात येण्याबाबतची मागणीही केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून त्वरित योग्य ती कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, बीड यांचेकडे दिनांक २३/०७/२०२० रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी सहायक गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पं) यांच्या संयुक्त पथकाद्वारे चौकशी करण्यात आली. सदरच्या चौकशी अहवालानुसार संबंधितावर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्हा परिषदे अंतर्गत वनपरिक्षेत्रात बांधकामासाठी वनविभागाची ना-हरकत घेण्यात आली नसल्याबाबत

**(२) ३८५७७ (२८-०३-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हापरिषद अंतर्गत वनपरिक्षेत्रात प्रस्तावित बांधकामासाठी उपलब्ध असलेली जागा वनक्षेत्रात येत नसल्याचे वन विभागाचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असून कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम,अमरावती यांनी पत्र दिनांक ७ डिसेंबर,२०२१ वा त्यासुमारास अ.क्र.१ अन्वये पोलीस अधिक्षक यांचे जिल्हापरिषद कार्यालयास ४६४ पैकी १२० प्रमाणपत्र सादर केले आहेत व वन विभागाची ना-हरकत घेण्यात आले नसल्याचे कळविले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, याप्रकरणी अनियमितता झाले असल्याने याची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-१०-२०२३) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

पोलीस अधिक्षक (ग्रामीण), अमरावती यांच्याकडून भाविकांच्या उपस्थिती बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येतात. त्यानुसार, त्यांनी सन २०२१ मध्ये ६९ व सन २०२२ मध्ये ३५ तीर्थक्षेत्रांना प्रमाणपत्र दिले आहे. वन विभागाचे प्रमाणपत्र हा विषय पोलीस अधीक्षक कार्यालयाशी संबंधीत नाही. याप्रकरणी संबंधित जिल्हा परिषद, वन विभागाच्या कार्यालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेत असते. तसेच जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार वन विभागाच्या प्रमाणपत्राशिवाय कोणत्याही तीर्थक्षेत्रांच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आलेली नाही. तसेच, ज्या ठिकाणी वन विभागाची हरकत असेल त्या ठिकाणी काम मंजूर करण्यात आलेले नाही. त्यामुळे अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) येथे क्रीडा संकुलाच्या वाढीव बांधकामाबाबत**

**(३) ३९७०४ (१२-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) येथे क्रीडा संकुलाच्या वाढीव बांधकाम करण्यासाठी तीन वर्षांचा आराखडा जिल्हा क्रीडा अधिकारी, जळगाव यांनी आयुक्त सो., क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांना जा.क्र. जिक्रीअ/ताक्रीस/माहिती/२०२०-२१/४८६ पत्रांन्वये सादर केला असून त्यासाठी एकूण रुपये ४९९.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे असे सूचित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुका क्रीडा संकुलाला यापूर्वी १००.०० लक्ष निधी उपलब्ध झाला असून त्यानुषंगाने सदरील क्रीडा संकुलाच्या वाढीव बांधकाम करण्यासाठी अजून जवळपास रुपये ३९९.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुका क्रीडा संकुल, चाळीसगावच्या वाढीव बांधकाम करण्यासाठी एकूण रुपये ३९९.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी क्रीडा व युवक कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या मागणीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२५-१०-२०२३) :** (१) होय.
(२), (३) व (४) राज्य क्रीडा विकास समितीच्या दिनांक १९/१०/२०२२ च्या बैठकीत तालुका क्रीडा संकुल, चाळीसगांव जि. जळगांव संकुलाच्या ५९४.३३ लक्षच्या अंदाजपत्रकास शासन देय अनुदाना व्यतिरिक्त अतिरिक्त निधी संकुल समितीने स्वबळावर उभारण्याच्या अटीवर प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
त्यानुषंगाने सदर संकुलासाठी यापुर्वी देण्यात आलेले रु.१००.०० लक्ष अनुदान व शासन निर्णय दि.१३/१२/२०२२ अन्वये रु ५०.०० लक्ष तसेच शासन निर्णय दि.३१/०३/२०२३ अन्वये रु.२५०.०० लक्ष याप्रमाणे दिनांक २३/३/२०२३ च्या शासन निर्णयानुसार सुधारित अनुदान मर्यादेत एकुण रु.४००.०० लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानूकुल करण्याबाबत**

**(४) ४४४७४ (२४-०३-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सर्वांसाठी घरे २०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानूकुल करण्याबाबत दिनांक १६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास धोरण जाहीर करून ही अद्याप स्थानिक पातळीवर सदरील धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२२ रोजी त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके व वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना यानुसार शासकीय जमिनीवरील दिनांक ०१/०१/२०११ पर्यंतची अतिक्रमण केलेल्या कुटुंबांना ५०० चौ. फुटापर्यंत ते २००० चौ. फुटापर्यंतची अतिक्रमणे नियमानकुल करण्याबाबत स्पष्ट सुचना देऊन ही याबाबतची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.अप्पर मुख्य सचिव ग्रामविकास, मा.विभागीय आयुक्त पुणे व मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय जमिनवरील नियमानकुल करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच विभाग व जिल्हानिहाय शासकीय जमिनिवरील अतिक्रमणे नियमानकुल केलेले अतिक्रमणांची संख्यात्मक आकडेवारी किती आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) राज्यात सर्व जिल्ह्यात नोंदणी केलेल्या गावठाण क्षेत्रातील अतिक्रमणांची एकुण संख्या २,५४,७८१ इतकी असून त्यापैकी ६,०८८ इतकी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात आली आहेत.

(४) शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे निमयमानूकुल करतांना खालील अडचणी येत आहेत.

१. गायरान जमिनिवरील अतिक्रमण नियमानुकूल करताना आवश्यक दुप्पट जमिन नसणे.

२. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानूसार महसूल व वन विभागाने दि. ११.१०.२०२२ अन्वये गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

तथापि, दि. २२.०८.२०२२ च्या शासन निर्णयान्वये महसूल विभागाव्यतिरिक्त अन्य प्रशासकीय विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

---

**गेवराई (जिल्हा बीड) तालुक्यातील चकलांबा ते चोरपुरी या रस्त्याचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन मध्ये समावेश करणेबाबत**

**(५) ४५६०० (०७-१०-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यातील चकलांबा ते चोरपुरी या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असल्यामुळे दिनांक १४ सप्टेंबर २०२१ रोजी चोरपुरी येथील श्रीमती आशाबाई उमाजी गंडे या आजारी महिलेला सदर रस्त्यावरून उपचारासाठी घेऊन जात असताना रस्त्याच्या दुरावस्थेमुळे उशीर झाल्याने सदर महिलेला आपला प्राण गमवावा लागला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वेळोवेळी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाकडे मागणी करून देखील सदर रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे अश्या प्रकारच्या दुर्दैवी घटना पुन्हा पावसाळ्यात घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्वातंत्र्य प्राप्तीच्या अनेक वर्षानंतर ग्रामस्थांनी पक्क्या रस्त्याची केलेली मागणी लक्षात घेता उक्त रस्त्याच्या कामाचा मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन मध्ये विशेष बाब म्हणून समावेश करण्यासाठी शासन स्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) अशी बाब आढळून येत नाही.
(३) व (४) सदर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत पॅकेज क्र.ADB-BEE-II मध्ये मंजूर करण्यात आला आहे.व त्याबाबतची प्रक्रिया निविदास्तरावर प्रगतीत आहे.

---

## अमरावती जिल्हा परिषदेच्या मालमत्तेच्या नोंदी अपूर्ण असल्याबाबत

**(६) ४७३०१ (१०-११-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हापरिषदेच्या मालकीची कोटयावधीची मालमत्ता शहरासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरील काही मालमत्ताच्या नोंदी विभागाकडे नाहीत, काहींचा मालकीहक्क दुसऱ्याकडे आहे तर काही मालमत्तांवर अतिक्रमणे झाली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अशा जागा व जमिनींची माहिती घेवून त्या जिल्हापरिषदेच्या मालकीच्या असतील तर त्या रितसर नांवे करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जमिनींच्या महसूल अभिलेख्यांवर हकदार सदरी जिल्हा परिषदेचे नाव घेण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेच्या स्तरावर सुरु आहे.

---

## अहमदनगर जिल्ह्यातील घरकुलांच्या अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत

**(७) ४९५७० (२९-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यामध्ये वर्षभरात १८ हजार ४४२ पैकी केवळ ६४५ असे ३.५० टक्के घरकुले पूर्ण झाल्याची बाब दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू घरकुलांसाठी लागणारे सिमेंट, विटा, वाळू आणि मजुरीचे जास्तीचे दर व दुसरीकडे शासनाकडून मिळणारे अल्प अनुदान, या अन्य कारणांमुळे शासनाची घरकुले लाभार्थ्यांसाठी मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घरकुलांसाठी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान १ लाख २० हजार हे फारच कमी असून त्यामध्ये घर बांधणे शक्य नसल्याने घरकुलांच्या अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
अहमदनगर जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या "ब" यादीतील १०० टक्के पात्र लाथार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच सद्यस्थितीत आवास प्लस "ड" यादीतील १३,९५८ घरकुले पूर्ण झाली आहेत.
(३) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांच्या अनुज्ञेय अनुदानात रु.२.५० लक्ष वाढ करण्याबाबत ग्रामीण विकास मंत्रालय,भारत सरकार यांच्याकडे दिनांक २५.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक ०२.१२.२०२० च्या पत्रान्वये अशी कुठलीही वाढ करता येत नाही, असे कळविले आहे. तद्नंतरही दि.०१.०८.२०२२ रोजी पुन्हा केंद्र शासनाकडे अनुदान वाढीची मागणी केली आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडून अद्याप प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे व भंडारा जिल्हयातील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलांच्या अनुदानाबाबत

**(८) ४९७२० (१३-०२-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)ग्रामीण भागासाठीच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २०२१-२२ मध्ये मंजूर ४२०९ लाभार्थ्यांपैकी १३०० भूमिहीन लाभार्थ्यांना अद्यापही घरकुलासाठीचे अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हयात सन २०२१-२२ मध्ये ग्रामीण भागासाठीच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर ४२९६ लाभार्थ्यांपैकी २९७८ लाभार्थ्यांना अद्यापही घरकुलासाठीचे अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, तसेच भंडारा जिल्हयातील ग्रामीण भागात पंतप्रधान आवास योजनेचे अनुदान मंजूर होऊनही घरकुलांचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर-२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार पुणे व भंडारा जिल्हयातील उक्त योजनेंतर्गत प्रलंबित असलेल्या घरकुलाचे अनुदान वितरीत करण्यासह प्रलंबित असलेल्या घरकुलांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) पंतप्रधान आवास योजनेतंर्गत पुणे जिल्हयात जागा नसलेल्या एकुण ४,३७३ लाभार्थ्यांपैकी १,०६२ लाभार्थ्यांना शासकीय व पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल अर्थसहाय योजनेंअतर्गत जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उर्वरित ३,३११ लाभार्थ्यांपैकी १,१८८ लाभार्थ्यांचे जागा उपलब्धतेसाठीचे प्रस्ताव विविध विभागाकडे सादर करण्यात आले आहे. जागा उपलब्ध नसणाऱ्या लाभार्थ्यांना अनुदान वितरित होत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत लाभार्थ्यांना अनुज्ञेय अनुदानाची रक्कम त्यांनी केलेल्या बांधकामाच्या टप्यानुसार त्यांच्या खात्यात थेट जमा केली जाते.

पुणे जिल्हयात एकुण १९,१७७ इतक्या मंजूर घरकुलापैकी १६,०१० घरकुले पुर्ण झाली आहेत. तसेच भंडारा जिल्हयात एकुण ६३,७०६ इतक्या मंजूर घरकुलापैकी ५६,७०५ घरकुले पूर्ण झाली आहेत. सदर दोन्ही जिल्हयातील उर्वरित घरकुले प्रगतीपथावर आहेत. तसेच सदर योजना गतीमान करण्यासाठी राज्यात महाआवास अभियान राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात विभागीय क्रीडा संकुल नवीन इनडोअर स्टेडियम साठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत**

**(९) ५१२१३ (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात विभागीय क्रीडा संकुल नवीन इनडोअर स्टेडियमसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागील जागेत प्रस्तावित करून त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास अमरावती येथील आढावा बैठकीत सुचविण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-१०-२०२३) :** (१) व (२) होय.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागे असलेली खुली जागा विभागीय क्रीडा संकुलाच्या विस्ताराकरीता क्रीडा विभागास हस्तांतरीत करण्याबाबत विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती यांनी दि. १६/१२/२०२२ अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे मागणी केलेली आहे. सदर जागा क्रीडा विभागास हस्तांतरित झाल्यावर राज्य क्रीडा विकास समितीच्या मान्यतेनंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुका क्रीडा संकुलन मंजूरीबाबत**

**(१०) ५१८२२ (१८-०१-२०२३). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे क्रीडा धोरण २००१ नुसार भिवंडी तालुका क्रीडा संकुलन मंजूर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, मा. क्रीडा मंत्री, महाराष्ट्र राज्य. यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त निवेदनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-१०-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, भिवंडीसाठी जुना स.नं. १६९/अ, नवीन स.नं. ३/अ मधील एकुण ७.२८.०० हे.आर.पैकी ५.६० हे.आर. एवढी जागा प्राप्त झालेली असून, तालुका क्रीडा संकुल समितीच्या दिनांक १७.२.२०२३ च्या बैठकीत सदर जागेवर तालुका क्रीडा संकुलाची उभारणी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २३/३/२०२२ अन्वये अनुज्ञेय अनुदान मर्यादेनुसार रु. ५००.०० लक्ष च्या मर्यादेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जत (जि.सांगली) मधील ग्रामपंचायतीना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(११) ५३१२८ (२०-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) येथे १२६ महसूल गावे असून ग्रामपंचायतींची संख्या ११६ आहे उर्वरित १० गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र शासनाच्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम कायदा १९५८ च्या कलम ५ च्या तरतुदीनुसार ज्या गावची लोकसंख्या ६०० किंवा अधिक आहे तेथे ७ सदस्य संख्या इतके ग्रामपंचायत मंजूर होणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या निकषाप्रमाणे उर्वरित १० गावांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६०३/ प्र.क्र.१५४४/पंरा-४ (२२), दि. १२.०२.२००४ नुसार स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेसाठी गावाची लोकसंख्या कमीत कमी २००० असणे आवश्यक आहे.

(३) सदर गावे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचे निकष पूर्ण करीत नाहीत. सबब सदर गावे ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तालुक्याच्या ठिकाणाप्रमाणे अपर तहसिलदार कार्यालयाच्या ठिकाणांवरही तालुका क्रीडा संकुल उभारणेबाबत**

**(१२) ५४१२४ (१८-०१-२०२३). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अपर तहसिलदार कार्यालय असलेल्या परंतु तालुक्याचे ठिकाण नसलेल्या शहरांमध्ये तालुका क्रीडा संकुल उभारता येत नसल्याने त्या भागातील तरूण खेळापासून वंचित राहत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदनुषंगाने अपर तहसिल कार्यालय असलेल्या शहरांमध्ये क्रीडा संकुल मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०८-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण, २००१ अनुसार शासन निर्णय दिनांक दि.२६.०३.२००३ अन्वये क्रीडा विकासाकरीता तालुका हा घटक मानून तालुकास्तरावर प्रत्येक तालुक्यामध्ये एक तालुका क्रीडा संकूलाची निर्मिती करुन, तेथे खेळाडू, सर्वसामान्य नागरिक व मार्गदर्शकांसाठी विविध खेळांच्या किमान क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. याअंतर्गत जमीन उपलब्धतेनुसार राज्याच्या प्रत्येक तालुक्याच्या मुख्यालयाचे ठिकाणी एका तालुका क्रीडा संकूलाची निर्मिती करण्यात येत आहे. सदर तालुका क्रीडा संकूलाची जागा ही तालुका क्रीडा संकूल समिती, जिल्हाधिकारी व संबंधित लोकप्रतिनिधी यांच्या सहमतीने निश्चित करण्यात येते. मात्र जर तालुक्यामध्ये इतर ठिकाणी अशी अधिक सोयीची व मध्यवर्ती ठिकाणी आवश्यक शासकीय जमीन उपलब्ध झाल्यास, अशी जागा तालुका क्रीडा संकुलासाठी निश्चित करण्यात येते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा (जि.लातूर) येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(१३) ५४३५७ (१९-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथे तालुका क्रीडा संकुल उभारण्याबाबत व त्यासाठी आवश्यक असलेली जमीन संपादित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०३/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तालुका क्रीडा संकुल उभारण्याकरीता जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळंब (जि.यवतमाळ) येथील मंजूर क्रीडा संकुलाचे काम अद्याप पर्यंत सुरु करण्यात आले नसल्याबाबत

**(१४) ५४६५९ (१९-०१-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.यवतमाळ) शहरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून क्रिडांगण विकास योजने अंतर्गत सन २०१२ ते २०१३ मध्ये कळंब येथे क्रीडा संकुल मंजूर करण्यात आले होते परंतु अजूनही मंजूर क्रीडा संकुलाचे बांधकाम करण्यात आले नसल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत विभागाच्या अधिकारी यांनी क्रीडा संकूल बांधकाम करण्यासाठी सन २०१५ या वर्षामध्ये एका जागेची निवड केली होती त्या जागेवर भिंत बांधण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदरहू मंजूर क्रीडा संकुलाचे बांधकाम करणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-१०-२०२३) :** (१), (२) व (३) महसूल विभागाकडून तालुका क्रीडा संकुल, कळंब करीता जागा क्रीडा विभागाच्या नावे करण्याची कार्यवाही करत असतांना सदर जागा खाजगी मालकीची असल्याचे तहसिलदार, कळंब यांनी दि.१५/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा क्रीड़ा अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना कळविले असल्याने क्रीडा संकुलाचे बांधकाम थांबविण्यात आले आहे तसेच क्रीडा संकूल समितीच्या ठरावानुसार चौकशी समिति गठीत केली असून, चौकशी अहवाल अद्यापही अप्राप्त आहे. तथापि, तालुका क्रीडा संकुलाकरीता पर्यायी जागेचा शोध घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करुन शासन सेवेत समायोजित करणेबाबत**

**(१५) ५५५७० (२१-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करुन शासन सेवेत समायोजित करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, यांना लेखी निवेदन दिल्यानुसार मुख्य सचिव, यांना तात्काळ संबधितांची बैठक घेउन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीच बैठक वा प्रस्तावही सादर करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करुन शासन सेवेत समायोजित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-०८-२०२३) :** (१) सन्माननिय लोकप्रतिनिधींनी दि.०५.०८.२०२३ रोजी अशा आशयाचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिले आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री ग्रामसडक अंतर्गत योजनेच्या अंमलबजावणीसाठी कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत सामान्य प्रशासन व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले आहेत.
तसेच, याच विषयाच्या अनुषंगाने दि.०७.१२.२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंठा (जि.जालना) येथील क्रीडासंकुलाबाबत**

**(१६) ५६४५३ (२१-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना जिल्ह्यातील मंठा येथे रु. १५ कोटी इतक्या रक्कमेचे भव्य क्रीडासंकुल मंजूर असून निधी अभावी क्रीडासंकुलाचे बांधकाम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तरुणांचे भविष्य घडविणाऱ्या क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी राज्य सरकार उदासीन आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्नुषंगाने क्रीडासंकुलासाठी त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्यासह बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-१०-२०२३) :** (१) , (२) व (३) शासन निर्णय दि.२३.०३.२०२२ नुसार प्रगतीपथावरील / अपूर्ण तालुका क्रीडा संकुलासाठी रु. ३ कोटी अनुदान मर्यादा निश्चित केली आहे. तालुका क्रीडा संकुल मंठा जि. जालना या येथील क्रीडा संकुलातील क्रीडा सुविधांची कामे प्रगतीपथावर असून शासनाने अनुदान मर्यादेनुसार रु. ४००.०० लक्ष निधी वितरीत केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**सोनगांव (ता.राहुरी) येथील जिल्हा परिषदेचा पाझर तलाव फोडल्याने तलावाचे व लगतच्या शेतक-यांच्या शेतीचे झालेल्या नुकसानीबाबत**

**(१७) ५७४८८ (२४-०४-२०२३). श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी) श्री.अजित पवार(बारामती) श्री.छगन भुजबळ (नाशिक), :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोनगांव (ता.राहुरी) येथील जिल्हा परिषदेच्या पाझर तलावाचा बांध जेसीबी मशीनच्या सहाय्याने दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास फोडल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बांध फोडल्यामुळे तलावातील पाणी लगतच्या शेतजमीनीमधून प्रवाहित झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाचे नुसकान झाल्याबाबत तेथील ग्रामस्थांनी शासनाकडे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त तलावाचा बांध फोडून लगतच्या शेतजमीनीमधून पाणी प्रवाहित होऊन झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या नुकसानीबाबत त्यांना भरपाई देण्याबाबत तसेच बांध फोडणाऱ्याविरुध्द शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-१०-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३) उपअभियंता जि.प.ग्रा.पा.पुरवठा राहुरी यांनी सदर बाबत दिनांक १२/१२/२०२२ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केलेली आहे. त्यामध्ये तलावाचा बांध फोडला नसून सांडवा दोन ठिकाणी फोडल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच खालील बाजूस शेतक-यांचे नुकसान झाले बाबत ग्रामस्थानी कळविले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण श्रीरामपूर यांचे मार्फत जलजीवन मिशन योजनेचे काम मंजूर असून उपरोक्त झालेल्या नुकसानीबाबत तसेच संबधित ठेकेदारावर करावयाच्या कारवाईबाबत उपविभागीय अधिकारी म. जी. प्रा. श्रीरामपूर यांना व संबंधित ठेकेदारास दिनांक १४/१२/२०२२ व ११.०५.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच विभागीय कार्यालया मार्फत दि. १२.०५.२०२३ रोजी संबंधित ठेकेदार व कार्यकारी अभियंता म.जी.प्रा. विभाग अहमदनगर यांना सदर तलावाच्या नुकसानीची दुरुस्ती करुन सांडवा पुर्ववत करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**नेहरूनगर (जि.सोलापूर) शहरातील शासकीय मैदानाच्या दुरवस्थेमुळे क्रीडापटूंची आणि स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याबाबत**

**(१८) ५७९६८ (२४-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील नेहरूनगर येथील शासकीय मैदानात सर्वत्र गवत वाढल्याने वॉकिंग ट्रॅकची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाल्याने क्रीडापटूंची आणि स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मैदानावर जिल्ह्यातील विविध खेळांच्या स्पर्धा तसेच पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणारे होतकरू तरुण-तरुणी आणि व्यायामासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक येत असूनही या मैदानाकडे दुर्लक्ष करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर शासकीय मैदानाची तातडीने देखभाल दुरुस्ती आणि अद्यावत स्वच्छतागृहे करण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०८-११-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

नेहरू नगर येथील सर्वे न. ५९० ते ५९४ या गटामध्ये नेहरु नगर मैदान हे वन विभागाच्या अखत्यारित आहे. सन १९८८ मध्ये जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी क्रीडा स्पर्धा व क्रीडा खात्याचे इतर उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, सोलापूर यांना अटी व शर्तीच्या अधिन राहून मैदान वापरण्यासाठी दिले आहे. सन २०१६ पासून तिथे सोलापूर महानगरपालिकेमार्फत खेळाडूंसाठी मैदानात अनेक सुधारणा व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. त्याचा फायदा परिसरातील खेळाडू व सर्वसामान्य नागरिक यांना होत आहे. सी.एस.आर. च्या माध्यमातून काही खाजगी कंपन्यामार्फत मैदानात सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. जॉगर्स असोसिएशच्या माध्यमातून सदर मैदानात सन २०१६ साली २०० झाडे लावण्यात आलेली आहेत. सदर जागेवर सुविधा निर्माण करावयाच्या झाल्यास वन खात्याची परवानगी आवश्यक असते. तिथे पोलिस भरतीपुर्व प्रशिक्षण सुरु असते. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यामार्फत तेथे ओपन जिम उभारण्यात येत आहे.

(३) मैदानावर महानगरपालिकेमार्फत पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधण्यासत आली असुन पाण्याची सुविधा निर्माण केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागात फाईव्ह-जी मोबाईल सेवेसाठी चर खोदाईचे काम सुरु असलेबाबत**

**(१९) ५९३८७ (२७-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागात फाईव्ह-जी मोबाईल सेवेसाठी सर्व नियमांचे उल्लंघन करुन केबल टाकण्यासाठी चर खोदाईचे काम जोरात सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुडाळ तालुक्यातील झाराप-आडेली मार्गावर संबंधित कंपनीकडून चर खोदाई करताना उक्त मार्गावरील मोऱ्या, रस्ता साईट पट्टी धोक्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदनुसार नियमबाह्यरित्या केबल टाकण्यासाठी चर खोदाई करणाऱ्या कंपनीवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) कुडाळ तालुक्यातील झाराप-आडेली मार्गावर जिओ कंपनीकडून चर खोदाई करताना सदरच्या मार्गावर साईट पट्टी मध्ये OFC केबल टाकण्याचे काम पूर्व परवानगी घेऊन सुरु करण्यात आले, तसेच मो-यांची दुरुस्ती व रस्ता साईड पट्टी मध्ये OFC केबल टाकून सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील क्रीडापटूना व खेळांना प्रोत्साहन मिळण्यासाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्याबाबत**

**(२०) ६२४६९ (०२-०५-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील क्रीडापटूना व खेळांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी सर्व पाच विभागात विभागीय क्रीडा संकुल अनुदान देऊन उभारण्यात आले, परंतु या क्रिडा संकुलाच्या नियमित देखभाल दुरुस्तीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, क्रीडा संकुलाच्या देखभाल दुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांकडून व क्रीडापटूकडून देणग्या घेऊन निधी उभारला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी याबाबत चौकशी करुन क्रीडापटूंना आर्थिक भार सहन करावा लागू नये यासाठी विभागीय क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०८-११-२०२३) :** (१), व (२) हे खरे नाही.
(३) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता विभाग, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता रु.२०००.०० लक्ष इतकी तरतुद अर्थसंकल्पित केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धानोरा (जि.गडचिरोली) तालुका केंद्रावर विद्यार्थ्यांना क्रीडांगणासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२१) ६२८९३ (२७-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानोरा तालुका (जि.गडचिरोली) केंद्रावर विद्यार्थ्यांना क्रीडांगणासाठी कोणतीही व्यवस्था नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी तालुका केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगण असावे यासाठी स्थानिकांची अनेक वर्षांपासून मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडांगणासाठी आवश्यक असणारी जागा उपलब्ध असून त्यासाठी लागणारा रु. ५ कोटी इतक्या निधीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रस्तावीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार तालुका क्रीडांगणाची आवश्यकता लक्षात घेऊन त्यास रु. ५ कोटी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (०८-११-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, धानोरा साठी मौजा धानोरा सर्व्हे क्र. ४९४ येथील १.५६ हे आर जागा सन २०२१ मध्ये प्राप्त झालेली आहे. तालुका क्रीडा संकुल समितीने तयार केलेल्या रु.५०१.६९ लक्षच्या अंदाजपत्रकास शासन मार्फत राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर तालुका क्रीडा संकुलास दि.०८.०३.२०२३ रोजी रु. ५०.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. शासन निर्णय, दिनांक २३.०३.२०२२ अन्वये नवीन तालुका क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादा ५००.०० लक्ष इतकी विहित करण्यात आलेली आहे. बांधकामाच्या प्रगतीनुसार अनुज्ञेय निधी वितरीत करण्याची तजविज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोरगांव (पुनर्वसन), (ता. आर्वी, जि. वर्धा) या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणेबाबत

**(२२) ६२९१७ (०२-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बोरगांव (हरिषवाडा) (ता. आर्वी, जि. वर्धा) या गावातील शेत जमीनी निम्न वर्धा प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेली असून उक्त गावाचे पुनर्वसन दोन ठिकाणी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोरगांव पुनर्वसन (ता. आर्वी) ही नवीन वसाहत स्थापन झाली तेव्हापासून सदर गावाला स्वतंत्र ग्राम पंचायतीचा दर्जा अजूनही प्राप्त न झाल्यामुळे तेथील नागरिकांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार या पुनर्वसित वसाहतीला ग्राम पंचायतीचा दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) बोरगांव (पुनर्वसन) या नवीन ग्रामपंचायत स्थापन करणेबाबतच्या प्रस्तावातील त्रुटींच्या पूर्ततेचा अहवाल प्राप्त करुन नियमानुसार तपासून कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायतीचा आरोग्य आणि दिवाबत्ती कर वाढविण्याबाबत

**(२३) ६३०१९ (०२-०५-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीचा आरोग्य आणि दिवाबत्ती कर रुपये २५ असून तब्बल २५ वर्षात रुपयांचीही वाढ झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच आरोग्य करामध्ये सन १९९९ मध्ये वाढीव आकारणी लागू झाली असून त्यानंतरही अद्याप बदल झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार राज्यातील ग्रामपंचायतीच्या आरोग्य व दिवाबत्ती कर वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२५-१०-२०२३) :** (१) व (२) होय, खरे आहे,
(३) राज्यातील ग्रामपंचायतीच्या आरोग्य व दिवाबत्ती कराबाबतची सुधारणा विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परतूर शहरातील क्रीडा संकुलाचे काम निधी अभावी बंद असल्याबाबत

**(२४) ६३१७७ (०२-०५-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतुर शहरातील क्रीडा संकुलास दिनांक ०७/०४/२०१९ अन्वये रुपये १५ कोटीची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मुदत संपूनही निधीअभावी क्रीडा संकुलाचे काम बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील क्रीडा संकुलाचे काम ३० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित ७० टक्के कामासाठी रुपये १२ कोटी ५० लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देणेबाबत वारंवार पत्रव्यवहार करूनही मंजूर असलेला निधी उपलब्ध करून दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निधी अभावी प्रलंबित कामासाठी रुपये १० कोटी ५० लक्ष इतका निधी किती दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त कामास निधी उपलब्ध करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-१०-२०२३) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा धोरणांतर्गत प्रत्येक विभागीय, जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुले उभारण्याकरीता शासन निर्णय दि.२३.०३.२०२२ अन्वये नविन तालुका क्रीडा संकुला साठी रु.५००.०० लक्ष व जे पुर्ण/प्रगतीपथावर/अपुर्णअवस्थेत त्यासाठी रु.३००.०० लक्ष शासन अनुदान मर्यादा आहे. तालुका क्रीडा संकुल, परतूर, जि. जालना-करिता शासन अनुदानाच्या मर्यादेशिवाय अतिरिक्त लागणारी तरतुद संबंधित तालुका क्रीडा संकुल समितीने स्वबळावर उभारण्याच्या अधीन राहून रु.१६०१.५२ लक्ष अंदाजपत्रकीय खर्चास राज्य क्रीडा विकास समितीने मान्यता दिली. दरम्यान शासन निर्णय दि.२१.०३.२००९ अन्वये निश्चित केलेले रु.१००.०० लक्ष अनुदान व शासन निर्णय दि.२३.०३.२०२२ अन्वये वाढीव अनुदान रु.३००.०० लक्ष असे एकुण रु.४००.०० लक्ष शासन अनुदान मर्यादा असून त्यानुसार आतापर्यंत एकुण रु.३५०.०० लक्ष निधी परतूर तालूका क्रीडा संकूलास वितरीत करण्यात आलेला आहे. यातून तेथे क्रीडा सुविधांचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सांगोला नागरिकांना स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेबाबत

**(२५) ६३६६६ (०३-०५-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील सांगोला नाका परिसरामध्ये राहत असलेल्या लाभार्थ्यांचा शहरातील कोणत्याही ग्रामपंचायतीमध्ये समावेश नसल्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ तसेच मृत्यू दाखले, जन्मदाखले काढण्यास अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागातील नागरिकांनी त्यांना कर्नाटकात जोडावे अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त भागातील लोकांसाठी स्वतंत्र कानोपात्रा नगर हे ग्रामपंचायत कार्यालय अस्तित्वात आणावे अन्यथा शहराचा हद्दवाढ करून त्या भागातील लोकांचा समावेश करावा अशी मागणी नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मंगळवेढा तालुक्यातील (जि. सोलापूर) संत कान्होपात्रानगर ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर विचाराधीन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्याबाबत**

**(२६) ६५२०१ (२३-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांची यादी सन २०१९ पासूनच्या क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येऊन या यादी बद्दल हरकती व सूचना करण्यासाठी दिनांक १६ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास मुदत देण्यात आली असल्याची बाब उघडकीस आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी ही नवीन पध्दत लागू करणे म्हणजे पुरस्कार मिळविणाऱ्यांचा जाहिर अपमान असल्याची भावना क्रीडा क्षेत्रामध्ये व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन १९६९ पासून दरवर्षी हे पुरस्कार दिले जात असताना कोविड काळसंपून २ वर्षे झाली तरीही या दोन वर्षात पुरस्कारांची घोषणा न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुसार उक्त हरकती व सूचना दाखल करण्यास दिलेल्या कालावधी नंतर त्या हरकती व सूचना यांचा अभ्यास करून शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१८-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्काराने गौरविण्यात येते. सन २०१९-२०, २०२०-२१ व सन २०२१-२२ या वर्षातील प्रस्तावित पुरस्कार्थींची यादी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केली होती.
(२) सदर निवड पद्धती दि.१६ ऑक्टोंबर, २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे सुरु करण्यात आली आहे. पूर्वी पुरस्कार विजेत्यांना पुरस्कार जाहिर झाल्यानंतर निवडीबाबत आक्षेप घेतले जात होते. याबाबत पुरस्कार वितरण नियमावलीत सुधारणा करण्यासाठी क्रिडा क्षेत्रातील खेळाडू, क्रीडाप्रेमी, क्रिडासंघटना, नागरीक यांचेकडून प्राप्त सूचनांचा विचार करून दि.६आक्टोबर २०१७ चे धोरण आणले. या धोरणानुसार पुरस्कार निवड पद्धतीत पारदर्शकता आली आहे.
सबब सन २०१३ ते आजपर्यंत सदर पुरस्कार निवड पद्धती बाबत क्रिडा प्रेमी, संघटना, नागरीक यांच्याकडून आक्षेप किंवा हरकत विभागात नोंदवलेली नाही. पुरस्कार निवडीची ही पद्धत अत्यंत पारदर्शक आहे.
(३) दि.१४.७.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारीत नियमावली घोषित केली असून दि.२८.८.२०२३ रोजी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार वितरीत करण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबे घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(२७) ६५६३२ (२३-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेमधून 'सन २०२४ पर्यंत मागेल त्याला घर' अशी घोषणा केंद्र सरकारने करून सन २०१८ मध्ये पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून 'आवास प्लस' या ॲपद्वारे लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत तब्बल ३० हजार लाभार्थ्यांपैकी केवळ ३ हजार लाभार्थ्यांना घरकुले मिळाली असून सुमारे २७ हजार लाभार्थी कुटुंबे घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे 'समर्थन' या संस्थेने दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (आदिवासी विकास), अवर सचिव (आदिवासी विकास विभाग), आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्या पत्राद्वारे निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त २७ हजार पात्र आदिवासी लाभार्थी कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ठाणे जिल्हयाकरिता प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आवास प्लस प्रपत्र "ड" ची प्राधान्यक्रम यादी ३०,३३० कुटुंबांची अंतिम करण्यात आलेली असून त्यापैकी १५,११४ कुटुंबे अनुसूचित जमाती संवर्गाची आहेत. त्याचप्रमाणे राज्य पुरस्कृत शबरी आदिवासी घरकुल योजने अंतर्गत सन २०१८-१९ ते सन २०२२-२३ करिता ठाणे जिल्हयाकरिता २,५५६ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त असून १०० टक्के घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच सन २०२३-२४ करिता २,००० घरकुलांची उद्दिष्ट प्राप्त असून घरकुले मंजुरीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील क्रीडा अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२८) ६५६४२ (२३-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील ११७ तालुक्यांतील केवळ १५ तालुक्यांमध्ये क्रीडा अधिकारी कार्यरत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची ८०% पदे रिक्त असल्याचे सांगत १५ दिवसाच्या आत रिक्त पदे भरण्यासंदर्भात राज्याच्या क्रीडा मंत्री महोदयांनी सन २०२२ च्या पावसाळी अधिवेशनात सभागृहाला आश्वासित करूनही अद्यापपर्यंत तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे भरण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदे अद्यापर्यंत रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर रिक्त पदे कधीपर्यंत भरण्यात येणार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१८-१०-२०२३) :** (१) अंशत: होय.
विदर्भात १२० तालुके असून तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गात एकूण ३५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी माहे मे, २०२३ मध्ये १६ पदे कार्यरत होती.
(२) होय.
(३) व (४) तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गात एकूण १०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५० पदे पदोन्नतीसाठी व ५० पदे सरळसेवेसाठी आहेत.

पदोन्नतीच्या ५० पदांपैकी ६ पदे कार्यरत होती. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दिनांक ०७.१०.२०२२ अन्वये तालुका क्रीडा अधिकारी, गट-ब (राज.) या पदावर एकूण ४४ अधिकाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. सद्यस्थितीत तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गातील पदोन्नती कोट्यातील ३७ पदे कार्यरत असून १३ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरू आहे.

तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गातील सरळसेवेच्या ५० पदापैकी १५ पदे कार्यरत असून ३५ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांपैकी १५ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्र.७४/२०२२, दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून ही १५ पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच आणखी १६ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्र.०३०/२०२३, दिनांक १९ मे, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून ही १६ पदे भरण्याची देखील कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगांना आकर्षित करण्यासाठी नव्या धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत

**(२९) ६५६५० (२८-०८-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील जास्तीस-जास्त उद्योग महाराष्ट्र राज्यात यावेत यासाठी राज्यातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ञ मंडळी, उद्योजक, कंपन्याचे संचालक, नॅसकॉम, दूरसंचार क्षेत्रातील तंत्रज्ञान व त्याला राज्य शासनाच्या आर्थिक सल्लागार परिषद यांच्याशी विस्तृत चर्चा करून शासनाने नवे माहिती तंत्रज्ञान धोरण दिनांक ३० मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात माहिती-तंत्रज्ञान उद्योगांना आकर्षित करण्यासाठी राज्य शासनाने रुपये ९५ हजार कोटींची गुंतवणूक रु.१० लाख कोटीची निर्यात तसेच ३५ लाख रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्दिष्टासाठी सदर माहिती तंत्रज्ञान धोरणाची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्याचे नवीन माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०२३ यांस मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ३०/०५/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत मा.मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. सदर धोरण दिनांक २७/०६/२०२३ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आले असून, सदर धोरणाची वैधता ५ वर्षाच्या कालावधीसाठी किंवा नवीन धोरण जाहीर होईपर्यंत असणार आहे. धोरणात नमूद केलेली उद्दिष्ट व लक्षांक धोरण कालावधीत साध्य करण्यासाठी सदर धोरणामध्ये या क्षेत्राकरिता विविध आर्थिक व बिगर आर्थिक प्रोत्साहने तसेच सवलती उद्योजकांना अनुज्ञेय करण्यात आल्या आहेत.

---

## सातारा जिल्हयातील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३०) ६५७०३ (२३-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयात क्रीडा अधिकाऱ्यांची ९ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे ही केव्हापासून रिक्त आहेत व त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सातारा जिल्हयातील तालुकास्तरावरील खेळांडूचे विविध प्रश्न व अडचणींचा विचार करता क्रीडा अधिकाऱ्यांअभावी खेळाडूंना कोणत्याच कामाचा वा शासकीय योजनांचा लाभ घेता येत नसल्याने खेळाडूंना मुंबई वा पुणे येथे जाऊन मार्गदर्शन घेण्याची वेळ येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने त्याप्रकरणी चौकशी केली आहे त्याअनुषंगाने सातारा जिल्हयातील तालुका क्रीडा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१८-१०-२०२३) :** (१) अंशत: होय.
सातारा जिल्ह्यातील एकूण ११ तालुक्यांपैकी सद्यस्थितीत तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गातील ०३ पदे मंजूर असून ०१ पद रिक्त आहे.
(२) सन २०२० पासून
(३) नाही.
सद्यस्थितीत तालुका क्रीडा अधिकारी पदे मंजूर नसलेल्या तालुक्यांचा कार्यभार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील कार्यरत क्रीडा अधिकारी व क्रीडा मार्गदर्शक यांच्याकडे सोपविण्यात आलेला असून त्यानुसार तालुकास्तरावरील कामकाज चालू आहे.
(४) तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गात एकूण १०० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ५० पदे पदोन्नतीसाठी व ५० पदे सरळसेवेसाठी आहेत.
पदोन्नतीच्या ५० पदांपैकी ६ पदे कार्यरत होती. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक ०७.१०.२०२२ अन्वये तालुका क्रीडा अधिकारी, गट-ब (राज.) या पदावर एकूण ४४ अधिकाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे. सद्यस्थितीत तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गातील पदोन्नती कोट्यातील ३७ पदे कार्यरत असून १३ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
तालुका क्रीडा अधिकारी या संवर्गातील सरळसेवेच्या ५० पदापैकी १५ पदे कार्यरत असून ३५ पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांपैकी १५ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्र.७४/२०२२, दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून ही १५ पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच आणखी १६ पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्र.०३०/२०२३, दिनांक १९ मे, २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून ही १६ पदे देखील भरण्याची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेलवाई (ता.यावल,जि.जळगाव) येथील नाल्यावर मोरी बांधण्याबाबत**

**(३१) ६६१६१ (२३-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) तालुक्यातील फैजपूर-कळमोदा दरम्यान बेलवाई नाल्यावर मोरी बांधण्याच्या मागणीसाठी कळमोदा ग्रामस्थांनी प्रांत कार्यालयासमोर माहे ऑगस्ट,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने लेखी आश्वासन दिले आहे, मात्र दहा महिने होवूनही सदर काम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरील नाल्यावर तातडीने मोरीचे बांधकाम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-१०-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) यावल, जि.जळगाव येथील फैजपूर-कळमोदा रस्ता हा रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार इतर जिल्हा मार्ग क्र.१३ दर्जाचा आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र.१/९०० मध्ये बेलवाई नाला असून सदर नाल्यावर लहान पूल बांधणे आवश्यक आहे.

सदर ठिकाणी लहान पूलाच्या रु.३०.०० लक्षच्या कामास जिल्हा वार्षिक योजना सन २०२३-२४ मध्ये इतर जिल्हा रस्ते विकास व मजबूतीकरण योजनेंतर्गत (५०५४-४५१३) मंजूरी प्राप्त असून जिल्हा परिषदेद्वारे पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा परिषदेतील महिला व बालकल्याण विभागातील महिलांसाठी असलेली डिबीटी योजना बंद असल्याबाबत**

**(३२) ६६१८१ (२३-०८-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परिषदेतंर्गत महिला व बालविकास विभागातील महिलांसाठी असलेल्या सेस फंडात यंदाच्या अर्थसंकल्पात अपूरी तरतूद झाल्याने येथील महिलांसाठीची डिबीटी योजना बंद असल्याचे माहे मे-२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वैयक्तिक लाभाच्या योजनेचा येथील महिलांना स्वंयरोजगारासाठी मोठी मदत होत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त योजनेसाठी निधी उपलब्ध करुन ती पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०२-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) सदर योजनेसाठी पुनर्विनियोजनाद्वारे रु. २०.०० लक्ष ची तरतूद जिल्हा परिषदेने केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### फुलवाडी (ता. पाथरी, जि.परभणी) गावाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(३३) ६६८२० (२३-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फुलवाडी (ता.पाथरी जि.परभणी) या गावाला जोडणारा एकमेव रस्ता असलेल्या बाभळगांव-कुलारवाडी या ५.५ किमी रस्त्याच्या कामासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून ३ कोटी २५ लाख रुपयांची मंजूरी सन २०१८ मध्ये देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्याचा कालावधी ऑगस्ट, २०१९ पर्यंत असतांनाही अद्यापपर्यंत केवळ ५० टक्केच काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संथगतीने काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (३०-१०-२०२३) :** (१) व (२) होय,हे खरे आहे.
(३) व (४) कामास विलंब झाल्याने संबधीत कंत्राट्दार यांच्यावर निविदा अटी व शर्थीनुसार रक्कम रु.८५३१०/- प्रति आठवडा याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

### परभणी जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने मंजूर केलेल्या आराखडयाबाबत

**(३४) ६६८४६ (२३-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात माहे एप्रिल ते जून, २०२३ या तीन महिन्यांत पाणीटंचाई जाणवू नये यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने ४०९ योजना प्रस्तावित करत ३ कोटी ३४ लाख ८० हजार रुपयांचा आराखडा प्रस्तावित केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आराखडयास जिल्हा प्रशासनाने मान्यताही दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निधीतून आतापर्यंत पाणी पुरवठ्याच्या योजना वा उपाययोजना करण्यात आल्या आहेत वा याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१८-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) परभणी जिल्हयामध्ये ३० जून, २०२३ पर्यंत एकूण ३४ गावे वाडयांमध्ये ४२ खाजगी विहिर अधिग्रहण करुन पाणी पुरवठा करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत उपाययोजना बंद आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील कामे विना ई-निविदा ग्रामपंचायत स्तरावर देणेबाबत**

**(३५) ६६८८४ (२५-०८-२०२३). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगानुसार जलशुध्दीकरण यंत्र बसविण्याकरीता प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील प्रत्येक घराला नळाद्वारे पिण्याचे पाणी पुरविण्याकरीता जलजीवन मिशन सुरू करण्यात आले आहे, या मिशनच्या माध्यमातून लातूर जिल्हापरिषदेद्वारे विविध कामांना मंजुरी मिळालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोनही कामांसाठी एकत्रित निविदा काढण्याचा प्रयत्न लातूर जिल्हा परिषदेच्या वतीने प्रशासकीय स्तरावर होत आहे याबाबत लोकप्रतिनिधीनी तक्रारी केल्या आहेत तसेच दिशा समितीच्या बैठकीत याबाबत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १५ लाख रुपयांपर्यतची कामे विना ई-निविदा पध्दतीने काढण्याचा प्रशासकीय आदेश ग्रामविकास विभागाच्या वतीने देण्यात आलेला आहे तथापि, लातूर जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने त्यांचा अवलंब करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत लातूर जिल्हापरिषद प्रशासनाने एकत्रित निविदा काढण्याचे कारण काय आहे व याबाबत वेळोवेळी तक्रार करुनही संबंधीतांवर अद्यापी कोणतीही कार्यवाही का करण्यात आली नाही,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार लातूर जिल्ह्यातील उक्त दोन्ही योजनेत संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह १५ लक्ष रुपयांपर्यतची कामे विना ई-निविदा पध्दतीने ग्रामपंचायत स्तरावर देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०१-११-२०२३) :** (१) होय, खरे आहे

(२) होय, खरे आहे

(३) होय, हे अंशत: खरे आहे

उक्त दोन्ही कामे जल जिवन मिशन व १५ वा वित्त आयोग जि.प. स्तर ही वेगवेगळी आहेत. महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र ग्रापापु -२०२२ /प्र.क्र. २४९१/ पापु-१८ दिनांक २८ नोव्हेंबर २०२२ अन्वये जल जिवन मिशन अंतर्गत शासनाच्या सूचना प्राप्त झाल्यामुळे या कामाची एकत्रीत निविदा काढण्यात आलेली आहे. तसेच १५ वा वित्त आयोग जि.प. स्तर अंतर्गत आर.ओ. च्या कामाची एकत्रीत निविदा काढण्यात आली आहेत. दिशा समीतीमध्ये आर. ओ. फिल्टर बसविणे या कामाची चर्चा करण्यात आलेली आहे व त्याबाबतचे उत्तर सादर करण्यात आलेले आहे.

(४) अंशतः खरे आहे.

रू. १५.०० लक्ष पर्यंतची कामे ग्रामपंचायती कडूनच केली जात आहेत. तथापि तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. लातूर यांनी फक्त जिल्हा परिषद स्तरावरील १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत जलशुदधीकरण सयंत्र बसविणेच्या कामासाठी एकत्रीत निविदा काढण्याचे निर्देश दिलेले होते. सदरचे काम यंत्राचा पुरवठा /खरेदी स्वरूपाचे असल्यामुळे तसेच प्रत्येक काम स्वतंत्रपणे विविध एजन्सीद्वारे करतांना प्रत्येक वेळी एकाच वस्तूची (संयंत्राची) वेगवेगळी किंमत येत असल्याने त्याबाबत लेखा परिक्षणात आक्षेप घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कामात सुसुत्रता यावी या दृष्टीकोनातून फक्त जलशुदधीकरण सयंत्र बसविणे या कामाची एकत्रीत निविदा केल्यास, पुरवठा करावयाच्या संयंत्राची संख्या अधिक असल्याने जास्तीत जास्त निविदाधारक सहभाग नोंदवितील व स्पर्धा होवून कमीत कमी दर प्राप्त होतील व त्या कमी दराने उच्च गुणवत्तेचे काम करता येईल या हेतूने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रीत निविदा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार निविदा अंतिम करून व एजन्सी आणि दर ठरवून ग्रामपंचायतींना कळविण्यात आले व त्या मंजुर दराने ग्रामपंचायतींनी त्या एजनसीकडून फक्त आर.ओ. फिल्टर बसविणे हे काम करणे बाबत सूचना देण्यात आली.

(५) महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र प्रापापु-२०२२ /प्र.क्र.२४९१ /पापु-१८ दिनांक २८ नोव्हेंबर २०२२ अन्वये जल जिवन मिशन अंतर्गत शासनाच्या सूचना प्राप्त झाल्यामुळे जल जिवन मिशन या कार्यक्रमाची एकत्रीत निविदा काढण्यात आलेली आहेत.

तथापि तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प, लातूर यांनी फक्त जिल्हा परिषद स्तरावरील १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत जलशुदधीकरण सयंत्र बसविणेच्या कामासाठी एकत्रीत निविदा काढण्याचे निर्देश दिलेले होते. सदरचे काम यंत्राचा पुरवठा/खरेदी स्वरूपाचे असल्यामुळे तसेच प्रत्येक काम स्वतंत्रपणे विविध एजन्सीद्वारे करतांना प्रत्येक वेळी एकाच वस्तूची (संयंत्राची) वेगवेगळी किंमत येत असल्याने त्याबाबत लेखा परिक्षणात आक्षेप घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कामात सुसुत्रता यावी या दृष्टीकोनातून फक्त जलशुद्धीकरण सयंत्र बसविणे या कामाची एकत्रीत निविदा केल्यास पुरवठा करावयाच्या संयंत्राची संख्या अधिक असल्याने जास्तीत जास्त निविदाधारक सहभाग नोंदवितील व स्पर्धा होवून कमीत कमी दर प्राप्त होतील व त्या कमी दराने उच्च गुणवत्तेचे काम करता येईल या हेतूने तत्कालीन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रीत निविदा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

(६) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली नाही.

शासन निर्णय, ग्रमविकास विभाग झोडपीए-२०१५/प्र.क्र. १०/वित्त -९ बांधकाम भवन मुंबई दिनांक २५ मार्च, २०१५ नूसार रू. १५.०० लक्ष पर्यंतची कामे विना ई. निविदा ग्रामपंचायत मार्फत आदेश देवून पुर्ण करण्यात येत आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोदरी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) . येथील १५ वा वित्त आयोग अंतर्गत कामावर साहित्य पुरवठा व मजुरीची रक्कम न दिल्याबाबत

**(३६) ६६९१३ (२३-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोदरी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथे १५ वा वित्त आयोग सन २०२२- २०२३ अंतर्गत भुमिगत नाली बांधकाम करणे या कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य ग्रामपंचायत कार्यालयास पुरवठा करण्यात आले असून त्यापोटी संबंधिताना एकूण १,२६,०७०/- रुपये ग्राम पंचायत कार्यालयाकडून नियमानुसार देणे बाकी आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरचे काम दिनांक ०२/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास पूर्ण झालेले आहे. त्याची नोंद मोजमाप पुस्तीका क्र. १४१६ पान नंबर २४. २५ ते ३० ते ३३ वर नोंद झालेली असून नमुद रक्कम मिळणे बाबत ग्रामपंचायत कार्यालयाकडे संबंधितानी वारंवार विनंती करुन ही अद्याप त्यांना सदर रक्कम अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी चौकशी करून देय रक्कम देण्यास टाळाटाळ करणाऱ्या सर्व संबंधितावर कार्यवाही करून संबंधिताना देयके अदा करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री यांचेकडे दिनांक २६/०५/२०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदअनुषंगाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

कोदरी (ता.अंबाजोगाई, जि.बीड) . येथील १५ वा वित्त आयोग सन २०२२-२३ अंतर्गत भुमीगत बांधकाम रक्कम रू. १२६०७०/- रक्कमेचे काम आराखडयात समाविष्ठ असून देयक रक्कम रू.१२६०५०/- अदा करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सदरील काम हे सन २०२२-२३ या वर्षातील असून काम दि. २.९.२०२२ रोजी पूर्ण झालेले असून सन २०२२-२३ च्या प्राप्त निधीमधून संबंधितांस निधी अदा करण्यात आलेला आहे.

(३) होय, हे खरे आहे

(४) हे खरे नाही.

या कार्यालयाचे पत्र क्र.२७४५ दि.०८/०६/२३ व पत्र क्र. ३९१८ दि. १४/०८/२०२३ तसेच पंचायत समिती अंबाजोगाई या कार्यालयाकडून पत्र क्र.२५८४/२०२३ दि.०४/०८/२०२३ अन्वये पत्र देऊन शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करुन अनुपालन सादर करणे बाबत लेखी पत्र देण्यात आलेली आहेत. त्यनुसार सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत कोदरी, ता. अंबाजोगाई, जि.बीड यांनी १५ वा वित्त आयोग सन २०२२- २३ अंतर्गत समाविष्ठ काम भूमीगत नाली दिनांक २०/०९/२०२३ रोजी PFMS प्रणालीद्वारे बांधकाम रक्कम रुपये १२६०५०/- संबंधित पुरवठादार अनुक्रमे १. जगन्नाथ इंडस्ट्रीज-४६५००/- २.गजानन ट्रेडर्स- १४०००/- ३.जयहानुमान खडीकेंद्र -२४८५०/- ४.गोकुळ काशिनाथ कदम-४००७०/- अशी एकुण रू. १२६०५०/- अदा करण्यात आलेले आहेत.

(५) सदरील भूमिगत नाली काम दि. २.९.२०२२ रोजी पुर्ण झालेले असून सन २०२२-२३ च्या प्राप्त निधीमधून संबंधितांस निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

---

## माळेगाव (ता. केज, जि. बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचा सर्व्हे व अंदाजपत्रक चुकीचे/अपूर्ण झाल्याबाबत

**(३७) ६७७६१ (२८-०८-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळेगाव (ता. केज, जि. बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत प्रस्तावित नवीन पाईपलाईन पाणी पुरवठा विहीर ते पाणी टाकी पर्यंत शासकीय विभागाच्या बाजूने घेऊन माळेगाव येथे वस्तीवाढ झाल्यामुळे नविन १ पाणी टाकीची व गाव अंतर्गत वाड्या, वस्त्या वितरण व्यवस्था व इतर अनेक बाबींचा उल्लेख अंदाजपत्रकात करण्यात आलेला नाही. या सर्व बाबी सर्व्हे वेळी संबंधित कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणल्या हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक अर्धवट व चुकीच्या पध्दतीने केले असल्यामुळे सदरचे चुकीचे व अपूर्ण अंदाजपत्रक रद्द करून होणारी निवीदा प्रक्रिया रद्द करावी व फेर सर्व्हे करून नवीन योग्य प्रकारचे अंदाजपत्रक करावे अशी मागणी सरपंच व ग्रामस्थ, माळेगाव यांनी निवेदनाद्वारे मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, बीड. यांचेकडे केली आहे. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माळेगाव येथील चुकीचे व अर्धवट अंदाजपत्रक रद्द करून होणारी निवीदा प्रक्रिया रद्द करणेबाबत व ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांना विश्वासात घेऊन फेर सर्व्हे करून नवीन अंदाजपत्रके तयार करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाणी पुरवठा मंत्री यांचेकडे दिनांक ०१/०६/२०२३ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-१०-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मौजे-माळेगाव, (ता. केज,जि. बीड) या गावासाठी पुरक नळ योजनेची अस्तित्वातील उपाययोजनेचा उपयोग करून पुरक योजना तयार करण्यात आलेली आहे. निविदेच्या अनुषंगाने (ग्रामपंचायत ठराव क्र. ०६, ३०.०८.२०२२) प्राप्त असल्याने दिनांक १६.०९.२०२३ रोजी गावचे सरपंच व टिम लिडर व उप अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. संबंधित ग्रामपंचायतीस योजनेची उपांगे ही नवीन घेण्याबाबत ठराव

दिलेला आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेचे सर्व्हेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरुर तालुक्यातील गावांचे भूजल सर्वेक्षण करणेबाबत

**(३८) ६८१०९ (२३-०८-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि. पुणे) तालुक्यातील एकूण ९६ ग्रामपंचायतींपैकी वरिष्ठ भू-वैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा महाराष्ट्र शासन, शिवाजीनगर, पुणे यांनी दिनांक ११/०१/२०२१ रोजी वा त्यासुमारास केलेल्या सर्वेक्षणानुसार ४ ग्रामपंचायती या सुरक्षित वर्गवारीत येत असून, ११ ग्रामपंचायती अति शोषित तर तब्बल ८१ गावे ही अंशत: शोषित वर्गवारीत येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामधील फक्त ४ गावे वगळता ११ गावांमध्ये कोणत्याही प्रकारे शासकीय योजनेतील विहिर खोदता येत नाही, तसेच ८१ गावांमध्ये एकत्रितरित्या ३ शेतकरी मिळून सामुहिक सिंचन विहिर घ्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू जमिनीचे वाढत्या प्रमाणातील विभाजन लक्षात घेता ३ शेतकरी एकत्रित येणे दुर्मिळ असून तालुक्यातील ९२ गावांना सिंचन विहिरींची योजना राबविण्यास अडचणी येत असल्याने शेतकरी उक्त लाभापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त तालुक्यातील सर्व गावांचे नव्याने भूजल सर्वेक्षण झाल्यास वैयक्तिक लाभांच्या विहिर योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होणार असून नव्याने भूजल सर्वेक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१८-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. शिरुर तालुक्यातील ११५ गावांपैकी भूजल मूल्यांकन सन २०२१-२२ नुसार शिरुर तालुक्यातील ६ गावे सुरक्षित वर्गवारीत ( भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ७०% किंवा त्यापेक्षा कमी उपसा), ९० गावे अंशत: शोषित (भूजल उपलब्धतेच्या तुलनेत ७०% ते ९०% उपसा), १९ गावे अतिशोषित (भूजल उपलब्धतेच्या तुलनेत १००% वा अधिक उपसा) वर्गवारीत मोडत आहेत.
(२) व (३) अंशत: खरे आहे. नियोजन (रोहयो) विभाग, सुधारित शासन निर्णय क्रमांक मग्रारो- २०२१/ प्र.क्र.१८२/मग्रारो-१, दिनांक ४ नोव्हेंबर, २०२२ नुसार शोषित, अतिशोषित, व अंशत: शोषित वर्गवारीत येत असलेल्या गावांमध्ये एकापेक्षा अधिक शेतकऱ्यांना सामूहिक गट करुन सिंचन विहीर घेता येऊ शकते.
(४) केंद्रीय भूजल मंडळानी तयार केलेल्या भूजल अंदाज समिती २०१५ च्या कार्यप्रणालीनुसार राज्य शासनाच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व केंद्रीय भूजल मंडळ यांच्या सहकार्याने संयुक्तपणे केलेल्या सर्वेक्षणानुसार भूजल मूल्यांकनाची कार्यवाही करण्यात येते. सन २०२२-२३ मधील भूजल मूल्यांकनाचे काम प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलाचे अनुदान मिळण्याबाबत

**(३९) ६८७४४ (२३-०८-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजने मधील लाभार्थ्यांना घरकुलाचे अनुदान वेळेवर न मिळाल्याने ठेकेदार तसेच मेस्त्री यांनी पैसेअभावी कामे अपूर्ण सोडून दिल्याचे दिनांक १३ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू लाभार्थी निधी अभावी प्लीन्थ वर कच्चे बांधकाम करून टिन पत्राचे शेड उभारून त्यामध्ये राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदरहू लाभार्थांना पंतप्रधान आवास योजनेचे अनुदान वेळेवर देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
बुलढाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत एकूण ४४,६६७ घरे मंजूर असून, त्यापैकी ३०,८३९ लाभार्थ्यांनी घरकुलाची कामे पूर्ण केली आहेत. ऊर्वरित घरकुलांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बामणी (जि. परभणी) येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत स्मशानभूमी असलेल्या ठिकाणी विहिरीचे काम केल्याबाबत**

**(४०) ६८९०४ (२३-०८-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बामणी (जि.परभणी) येथे स्मशानभूमी असतांना तेथे जल जीवन मिशन योजनेअंतर्गत सुरु असलेले विहिरीचे खोदकाम बंद करण्याची स्थानिक नागरिकांनी मागणी केली असल्याचे माहे जून,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी स्मशानभूमी असतांना विहिर खोदण्यासाठी मंजूरी दिल्याची सर्वसाधारण कारण काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर ठिकाणी विहिर खोदण्यासाठी कोणत्याही प्रकारची मंजुरी देण्यात आलेली नाही.
(३) उक्त प्रकरणी उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिंतुर यांनी स्थळ पाहणी व चौकशी केली असून, भूवैज्ञानिक यांनी निश्चित केलेल्या जागेवर कोअर बोअर व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे विहिरीचे खोदकाम केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया येथील भूजल साठ्यात युरेनियम या किरणोत्सर्गी घटकाचा अंश सापडल्याबाबत**

**(४१) ६९०३७ (२५-०८-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया येथील भूजल साठ्यात युरेनियम या किरणोत्सर्गी घटकाचा अंश सापडल्याचे केंद्रीय भूजल मंडळाच्या मध्य विभागाच्या सर्वेक्षणातून दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ व चंद्रपूर या जिल्ह्यांमधील भूजलसाठ्यात फ्लोराइड आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदरहू ठिकाणच्या भूजल साठयातील युरेनियममुळे स्थानिक नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होवू नये, याकरिता शासनाकडून कोणत्या ठोस खबरदारीच्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-११-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

केंद्रीय भूजल मंडळाद्वारे महाराष्ट्रातील भूजल निरीक्षण विहिरीमधून मान्सूनपूर्व कालावधीत (मे-२०१९ ) विश्लेषण केलेल्या १०८५ नमून्यांपैकी तीन नमून्यांमध्ये भंडारा, गोंदिया, व नागपूर जिल्ह्यातील युरेनियमचे प्रमाण ३० ppb पेक्षा जास्त आढळून आले आहे,

(२) होय, यवतमाळ व चंद्रपूर जिल्हयातील काही भागात फ्लोराईड घटकाची मात्रा भारतीय मानक संस्थेने (BIS) चे मानक BIS १०५००:२०१२ अनुसार फ्लोराईड घटकांसाठी असलेल्या १.५ mg/ या प्रमाणापेक्षा अधिक आहे. सन २०२२-२३ दरम्यान चंद्रपूर जिल्हयातील जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळांमध्ये जलसुरक्षकांमार्फत प्राप्त रासायनिक अभियांनांतर्गत एकूण ११०५७ सार्वजनिक स्त्रोतांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली तपासणीअंती एकूण २२० पाणी नमुन्यांमध्ये बी. आय. एस. मानांकनापेक्षा अधिक (१.५ मिग्रॅ/लि.) फ्लोराईड आढळून आले.

तसेच यवतमाळ जिल्हयामध्ये तपासणी करण्यात आलेल्या एकूण ६१६७ पाणी नमुन्यांपैकी ५८ पाणी नमुन्यांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण बी.आय.एस. १०५००-१९९१ यांनी ठरवून दिलेल्या मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे.

(३) चंद्रपूर जिल्ह्यात फ्लोराईड बाधीत स्त्रोत असलेल्या गावांकरिता जलशुध्दीकरण सयंत्रे (DFU/R.O) बसविण्यात आलेली आहेत.

यवतमाळ जिल्हयात पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी स्त्रोत उपलब्ध करुन देण्यात आले असून सदर स्त्रोतामध्ये फ्लोराईडचे प्रमाण Bureau of Indian Standards १०५००.१९९१ ठरवून दिलेल्या मानकांपेक्षा कमी आहे व त्याचा वापर पिण्यासाठी करण्यात येत आहे.

फ्लोराईड बाधित आढळून आलेले स्त्रोत पिण्यास अयोग्य असल्याने, त्यांना ग्रामपंचायत मार्फत लाल रंगाने रंगीत करण्यात येऊन जनजागृतीकरिता ''पिण्यास अयोग्य'' असे दर्शविण्यात आले आहे.

केंद्रीय भूमिजल मंडळ, नागपूर कार्यालयामार्फत महाराष्ट्रातील भूजल गुणवत्तेच्या सनियंत्रणासाठी असलेल्या भिन्न भिन्न भुशाशास्त्रीय रचनेतील एकूण १०८५ भूजल स्त्रोताचे पाणी नमुने गोळा करण्यात आले होते. सदर नमुन्यांचे Uranium घटकासाठी ICP-MS उपकरणाच्या सहाय्याने रासायनिक पृथ:करण करण्यात आले होते. भारतीय मानक संस्थेच्या (BIS) BIS : १०५००:२०१२ या मानकानुसार पेयजलात Uranium घटकाची मात्रा ३०PPb कमी असणे आवश्यक आहे.तपासलेल्या एकूण १०८५ भूजल नमुन्यांपैकी केवळ ३ नमुन्यांत Uranium घटकाची मात्रा ३० ppb पेक्षा जास्त आढळून आली. असून आरोग्यास अपायकारक नाही, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपुरी (जि. नाशिक) तालुक्याच्या आमसभेमध्ये जलजीवन व शासनाच्या अन्य योजनांच्या आढाव्याबाबत

**(४२) ६९१९३ (२३-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी तालुक्याच्या ( जि. नाशिक ) आमसभेमध्ये जलजीवन व शासनाच्या अन्य योजनांचा आढावा माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आढावा बैठकीत कोणकोणते निर्देश देण्यात आले,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर आढावा बैठकीत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.
(अ) जल जीवन मिशन पाणी पुरवठा योजनेची कामे नियमानुसार योग्य पध्दतीने कंत्राटदाराकडून पूर्ण करावेत.
(ब) जल जीवन मिशन पाणी पुरवठा योजनेत संपूर्ण वाड्या/वस्त्यांचा समावेश करावा.
(क) राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत अपूर्ण असलेल्या योजना पूर्ण कराव्यात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील खामगाव मावळ भागात लोखंडी पाईप लाइनव्दारे पाणीपुरवठा करण्याबाबत

**(४३) ६९७०० (२५-०८-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील खामगाव मावळला प्लास्टीक पाईप लाइनव्दारे पाणीपुरवठा होत असल्याने सदरील पाईप लाईन उंदरांनी फस्त केल्याने पाणीपुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पाणीपुरवठा लोखंडी पाईप लाईन व्दारे करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर भागात पाणीपुरवठा लोखंडी पाईपव्दारे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१७-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) सदर योजनेचे HDPE/PVC/GI/DI पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर काही दिवस पाईप लाईन रिकामी असल्याने त्याची चाचणी करतांना गळतीच्या ठिकाणी दुरुस्त करून पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
तांत्रिकदृष्ट्या वरील पाईपलाईनचा विचार करून जल जीवन मिशन योजनेंतर्गत लोखंडी पाईपचा समावेश करून अंदाजपत्रकास मंजूरी घेऊन सद्य:स्थितीत लोखंडी पाईप लाईनचे काम प्रगतीपथावर आहे.
जल जीवन मिशन अंतर्गत वंचित वस्त्यांचे अंदाजपत्रक मंजूरी घेऊन अंदाजपत्रकातील उद्भवाचे काम सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(४४) ७०१२१ (२५-०८-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतर्गत अनेक जागा रिक्त असल्याने, विविध शासकीय कामे प्रलंबित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे जिल्हा परिषद अंतर्गत विविध शासकीय कार्यालयांतून तसेच शिक्षणविभागांतर्गत (माध्यमिक व प्राथमिक) असलेल्या शाळांमधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना मिळणारे शासकीय लाभ वेळेत मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही सेवानिवृत्त कर्मचारी मयत झाले आहेत तसेच प्रकरणे प्रलंबित असल्याने हयातीत असताना त्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या रिक्त जागा तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) शिक्षण विभाग (प्राथमिक) अंतर्गत असलेल्या शाळांमधून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना मिळणारे सर्व लाभ वेळेत मंजूर केले जातात परंतू काही वेळेस तांत्रिक कारणांमुळे शासकीय लाभ मिळण्यास विलंब होतो. विभागीय आयुक्त, कोकण यांचे परिपत्रक दि.९.८.२०१६ नुसार सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सर्व देय लाभ त्याच दिवशी मंजूर होण्याच्या दृष्टीने "आनंद निवृत्ती दिन" साजरा केला जातो. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन प्रकरणे त्याच महिन्यात मंजूर होणेसाठी पाठपुरावा केला जातो.
(३) अशी बाब नाही.
(४) जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून गट-क सरळसेवा पदभरतीच्या अनुषंगाने १८ संवर्गातील ७१५ पदांची जाहिरात दि.०५ ऑगस्ट, २०२३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर पदभरतीची प्रक्रिया सुरू आहे. तसेच, अनुकंपा तत्वावर सन २०२३ मध्ये २३ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंद्रपूर एमआयडीसीतील ८६६ उद्योगांपैकी १६८ उद्योग मागील सात वर्षात बंद पडल्याबाबत

**(४५) ७०१३४ (३१-०८-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर एमआयडीसीतील ८६६ उद्योगांपैकी १६८ उद्योग गेल्या सात वर्षात बंद झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतीवर अवलंबून असलेल्या नागरिकांना उद्योगातून रोजगार देण्याचे शासनाचे उद्दीष्ट असतांना जिल्ह्यातील जुन्या प्रकल्पातील गुंतवणूक घटल्याने नवे उद्योग सुरु होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील १६८ उद्योग बंद झाल्यामुळे लाखो नागरीक बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चंद्रपूर जिल्हयात उद्योगात वाढ करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२५-१०-२०२३) :** (१), (२), (३, (४) व (५) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्हयाचा औद्योगिक विकास करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून चंद्रपूर जिल्हयात १३ औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात आलेली असून एकूण ३२६३.८० हेक्टर आर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. त्यात एकूण आरेखित भूखंड ११३०असून त्यापैकी वाटप भूखंड ८७५ असून ३४७ भूखंड उत्पादनात आहेत व ८५ भूखंडावर उत्पादन बंद आहे.

चंद्रपूर जिल्हयात मागील वर्षात ५६ भूखंड वाटप करण्यात आले असून, वाटप करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये जवळपास रु.३५० कोटी एवढी गुंतवणूक प्रस्तावित असून ३७०० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच भद्रावती (मोठे) औद्योगिक क्षेत्रामध्ये मे. न्यु इरा क्लिनटेक सोल्युशन प्रा.लि. यांना ६३७.७४ हेक्टर जागा उपलब्ध करुन देण्यात आली असून प्रस्तावित उद्योगामध्ये रु.२००००कोटी गुंतवणूक कंपनी करणार आहे. तसेच सदर प्रकल्पामध्ये ६००० रोजगार उपलब्ध होणार आहे.

---

## देवगड (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील मुणगे ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४६) ७०३३८ (२५-०८-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड (जि सिंधुदुर्ग) तालुक्यातील मुणगे ग्रामपंचायत हद्दीतील श्री. देवी भगवती हायस्कूल ते आडबंदर गाबीतवाडी इ.जि.मा.क्र. ३४ यासुमारे ५ किमी लांबीच्या रस्त्याची मागील १५ वर्षाहून अधिक कालावधीपासून दुरुस्ती करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या डागडुजी व दुरुस्तीसंदर्भात ग्रामपंचायत तसेच आडबंदर विकास मंडळ यांनी उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, देवगड, मा. ग्रामविकासमंत्री तसेच मा.पालकमंत्री आदीकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्तावर जागोजागी खड्डे पडल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे सदर रस्त्याचे विनाविलंब मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण होण्यासाठी पुन्हा दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, ग्रामविकासमंत्री, उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती देवगड, स्थानिक लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत मुणगे आदीकडे आडबंदर विकास मंडळ, मुंबई (रजि नं एफ ३६८७५) तर्फे सविस्तर निवेदन सादर करून सदर रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत समाविष्ट करण्याबाबत मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (११-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अशा प्रकारचे निवेदन महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जिल्हा परिषद व ग्राम विकास विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(४) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार आचरा बंदर आडवली मुणगे रस्ता हा इतर जिल्हा मार्ग क्र.३४ दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी ३.९५० कि.मी. इतकी असून रस्त्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र | रस्त्याचा साखळी क्रमांक | मंजूर निधी रु. लाखात | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | कि.मी. (०/०० ते ०/४००) व (३/१०० ते ३/६००) = ०.९०० कि.मी. | २४.४६ | सदर रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना सन- २०२१-२२ व २०२२-२३ मधील मंजूर निधीतून पूर्ण. |
| २ | कि.मी. (०/४०० ते १/०० = ०.६०० कि.मी.) | २०.०० | जिल्हा वार्षिक योजना सन २०२२-२०२३ अंतर्गत मंजूर. |
| ३ | कि.मी. (१/०० ते २/८०० = १.८०० कि.मी.) | ६०.०० | सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखाशिर्ष ५०५४ - ०४ मार्ग व पूल अंतर्गत मंजूर. |
| | एकूण | १०४.४६ | |

उर्वरित सा. क्र. २/८०० ते ३/१०० आणि ३/६०० ते ३/९५० मधील लांबीच्या रस्त्याचे काम जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ प्रस्तावित असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि. पालघर) तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबिय घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत**

**(४७) ७०६८१ (२५-०८-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि. पालघर) तालुक्यात गत १५ वर्षापासून नव्याने दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण न झाल्याने अनेक कुटुंबे घरकुल योजनेसह शासनाच्या मोफत धान्य योजना व सेवासुविधापासून वंचित राहिले असून हलाखीचे जीवन जगत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्हयातील अनेक खेडयांमधील कुटूंबे झोपडयांमध्ये राहत असून दरवर्षी पावसाळयात घरांना गवताच्या छताला प्लास्टिक लावून गळतीपासून संरक्षण करण्याची वेळ तेथील आदिवासींवर येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्हयातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांचे सर्वेक्षण होऊन त्यांना घरकूल योजनेसह सर्व सोयीसुविधा उपलब्ध होणे व यास विलंब करणाऱ्यांवर कारवाई होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०११ च्या SECC (Socio Economic and Caste Census) जात सर्वेक्षणाच्या यादीनुसार २०१६ पासून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्रपत्र-ब सर्व लाभार्थी (वाडा तालुक्यामधील २२२८ व जिल्हयातील २४५६४ ) यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच २०११ SECC जात सर्वेक्षणाच्या यादीनुसार २०१८ मधील आवास प्लस प्रपत्र-ड सर्वेक्षणामधील सर्व पात्र लाभार्थींना प्राधान्य क्रमानुसार घरकुल योजनेचा लाभ देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
तसेच, प्रधानमंत्री आवास योजना प्रपत्र-ब व प्रपत्र-ड मध्ये समाविष्ट नसलेल्या लाभार्थींना राज्य शासनाच्या शबरी आदिवासी घरकुल योजना, अदिम जमाती आवास योजना व रमाई आवास योजनेअंतर्गत घरकुले मंजूर केलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"अटल आहार योजनेत" गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(४८) ७०६९७ (२५-०८-२०२३). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी मागील काही वर्षापासून राबविल्या जात असलेल्या "अटल आहार योजनेत" चंद्रपूर जिल्ह्यात अनेक बोगस कामगारांच्या नोंदी असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगारांच्या नावावर आहार पुरवठा केल्याचा कागदोपत्री देखावा संबंधित कंत्राटदाराकडून केला जात असून शासकीय कामे सुरु नसलेल्या ठिकाणीही आहार पुरवठा केल्याचे दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त गैरव्यवहाराप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२०-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

विविध बांधकाम संघटनांकडून अथवा विकासकाकडून किंवा बांधकाम ठेकेदारांकडून मध्यान्ह भोजन पुरविण्याबाबत मागणी केल्यानंतर सदर ठिकाणी पाहणी करुन/खातरजमा करुन मध्यान्ह भोजन पुरविण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरी (ता. केज, जि. बीड) येथे जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(४९) ७०७३४ (२८-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरी (ता. केज, जि. बीड) येथील जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून सदरचे काम मे. संतोष शाम सुंदर पडुळे या ठेकेदाराला दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले असतानाही अद्यापी पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण असतानाही ठेकेदारास दिनांक ७.९.२०२३ रोजी वा त्यासुमारास सर्व देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०६-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर योजनेचे काम प्रगतीपथावर असून, योजनेच्या कामाची भौतिक प्रगती ९६.२५ टक्के इतकी झाली आहे.

(२) सद्य:स्थितीत योजनेची किरकोळ कामे प्रगतीत असून या योजनेवर दिनांक ३०.०६.२०२२ अन्वये रु. ४५,१९,९४९/- इतके देयक दिलेले आहे. योजनेवरील अद्ययावत खर्च रु. १,६७,७४,७३३/- इतका झालेला आहे. तद्नंतर दिनांक ०७.०९.२०२३ रोजी वा त्यासुमारास ठेकेदारास कुठलेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

(३) योजनेची कामे प्रगतीपथावर असून आत्तापर्यंत झालेल्या उपांगाची त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आलेली असून, शासन मानकाप्रमाणे सर्व तांत्रिक कागदपत्रे वेळोवेळी घेण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला राष्ट्रीय दर्जा प्रदान करुन खेळाडूंना सोयी सुविधा उपलब्ध करुन दिण्याबाबत

**(५०) ७०९०९ (२५-०८-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः कोकण विभागात टेनिस बॉल क्रिकेट मोठ्या उत्साहात खेळले जात असून अनेक नामवंत खेळाडू यामधून निर्माण झाल्याची बाब माहे १ जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राज्यासह कोकण विभागात मोठया रक्कमेच्या बक्षिसांची टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेला राष्ट्रीय दर्जा प्रदान करून खेळाडूंना त्याच्या सुविधा उपलब्ध करून देणेबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्रुषंगाने उक्त स्पर्धेला राष्ट्रीय दर्जा प्रदान करुन सदर खेळाडूंना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (१८-१०-२०२३) :** (१) हे खरेआहे.
टेनिस बॉल क्रिकेट हा खेळ स्थानिक स्तरावर मोठया प्रमाणात खेळला जातो.
(२) व (३) नाही.
शासनामार्फत मोठया रकमेच्या बक्षीस योजना अंतर्गत टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत नाही. तथापि विविध क्रीडा मंडळे, क्रीडा संस्था, क्रीडा संघटना, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत अशा प्रकारच्या मोठया बक्षीस रकमेच्या स्वरुपात आयोजन करण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**नागपूर.** **सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.